। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ४० वा । बुधवार दिनांक १५ एप्रिल, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई.

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत शेखर रा. कास्ती बु. ता.लोहारा जि. धाराशिव हे दि.१३.०४.२०२६ रोजी कानेगाव ते कास्ती जाणारे रोडलगत हॉटेल राज गार्डन चे पाठीमागे अंदाजे १,८०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत बालाजी रा. ढेकरी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.१३.०४.२०२६ रोजी १६.०० वा. सु. ढेकरी येथील गावठान जमीनीत अंदाजे ५,००० किंमतीची ५० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

उमरगा पोलीस ठाण अंतर्गत चाटलापल्ले रा. गिमलगिरी बुधवी नगर हैद्राबाद ह.मु. नाईचाकुर ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१३.०४.२०२६ रोजी १९.३० वा. सु. श्रीमंत पवार यांचे शेता समोर मोकळ्या जागेत नाईचाकुर येथे अंदाजे १,६०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ४० सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### येळमाळ्यातून मोटारसायकलची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-राजमोहम्मद सलिम शेख, वय ५२ वर्षे, रा. खाजानगर ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ८०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.०३.०४.२०२६ रोजी अज्ञात व्यक्तीने आमराई मंदीर परिसर येरमाळा येथुन चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राजमोहम्मद शेख यांनी दि.०८.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहे.

## समता,न्याय आणि बंधुत्वाचा संदेश देणारी बाबासाहेबांची जयंती; धाराशिव येथे अभिवादनासह अन्नदान कार्यक्रम उत्साहात



धाराशिव दि.१४ एप्रिल (जिमाका) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज पुतळ्यास अभिवादन करून अन्नदान कार्यक्रम घेण्यात आला.सामाजिक न्याय, आर्थिक व सामाजिक संरक्षण उपलब्ध करून देण्याबाबत राज्य सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे. त्यानुषंगाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.या सर्व कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने दरवर्षी ८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह हा कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती ही केवळ स्मरणदिन नसून सामाजिक समता,न्याय,बंधुत्व आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज या परिवर्तनाचा संदेश देणारा प्रेरणादायी दिवस आहे. त्यांनी दिलेल्या संविधानामुळे प्रत्येक नागरिकाला समान हक्क मिळाले असून त्यांच्या विचारांची आजही समाजाला दिशा देणारी प्रेरणा मिळते.

त्यानुसार आज १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच या ठिकाणी समाज कल्याण कार्यालयाकडून अन्नदान स्वरूपात मसाले भात व जिलबीचे वाटप करण्यात आले.अन्नदान स्टॉलचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर,जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर व जिल्हा परिषदेचे समाज कल्याण समिती सभापती विश्वास कोकणे यांच्या हस्ते करण्यात आले.

या अन्नदान वाटप कार्यक्रमास समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले,समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने तसेच कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमामुळे समाजात एकोपा,समता आणि सेवाभावाची भावना अधिक दृढ होत असून, त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा संदेश यामधून देण्यात आला.

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना रिक्षा रॅलीद्वारे अभिवादन : भीम जयंतीचा जल्लोष



धाराशिव (शेख अंजुम)- महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सोमवार १३ एप्रिल रोजी भीमजी ऑटो रिक्षा युनियन यांच्या वतीने शहरातून ऑटोरिक्षा रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये १०० हून अधिक रिक्षा सहभागी झाले होते.

शहरातील मध्यवर्ती बस स्थानकातून या रॅलीचा शुभारंभ नगरसेवक सिद्धार्थ शिंगाडे, विशाल शिंगाडे, राहुल काकडे,आरपीआय चे नेते राजाभाऊ ओव्हाळ , दत्ता पेठे , सुजित साळुंके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भीमजी ऑटोरिक्षा युनियनचे अध्यक्ष नागेश बनसोडे, उपाध्यक्ष बाळासाहेब बनसोडे कोषाध्यक्ष योगेश वाघमारे , सचिव अक्षय बनसोडे सहसचिव शीतल धावारे , मार्गदर्शक अरुण रणखांब, जमाल तांबोळी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

ही रॅली बसस्थानक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच ताजमहल टॉकीज चौक, देशपांडे स्टॅन्ड, माऊली चौक, काळा मारुती चौक, त्रिशरण चौक लेडीज क्लब मार्गे राजमाता जिजाऊ चौक, बार्शी नाका, माणिक चौक, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, मार्गे पोलीस मुख्यालय, महात्मा ज्योतीबा फुले चौकात आल्यानंतर फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या रॅलीचे विसर्जन करण्यात आले. या रॅलीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोसह निळ्या ध्वजांनी रिक्षाची आकर्षक सजावट करण्यात आली होती. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आदी महापुरुषांचा गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून सोडला. तसेच या रॅलीचे ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करीत मोठ्या जल्लोषामध्ये स्वागत करण्यात आले. पोलीस कर्मचार्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. बाळासाहेब रणखांब, अभिजीत शिंगाडे, राकेश जगताप, नामदेव मस्के, शिवाजी हुंबे, रणजीत माळाळे , रोहित बनसोडे, निशिकांत माळाळे , दुष्यंत बनसोडे , आदींनी रॅली यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## धाराशिवच्या महिलांची उद्योगक्षेत्रात झेप ; ६२२ उद्योजिकांनी घडविला नवा इतिहास




धाराशिव, (जिमाका) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामुळे जिल्ह्यातील महिलांनी उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय भरारी घेतली असून,पारंपारिक चौकटीतून बाहेर पडत त्यांनी स्वावलंबनाचा नवा आदर्श निर्माण केला आहे.या योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या १०१५ प्रकल्पांपैकी तब्बल ६२२ प्रकल्प महिला उद्योजिकांचे असून, जिल्ह्यात 'नारीशक्ती'ची प्रभावी ओळख निर्माण झाली आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून,सुशिक्षित बेरोजगार महिला व युवकांना उद्योग उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देते.या योजनेमुळे महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळत असून,त्या केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम होत नाहीत,तर कुटुंबाच्या उत्पन्नातही महत्त्वाचा वाटा उचलत आहेत.

जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागातील महिलांनी विविध उद्योगांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे.विशेषतः ब्युटी पार्लर,पिठाची गिरणी,मिरची कांडप,खाद्यप्रक्रिया उद्योग,मसाला उद्योग अशा व्यवसायांत महिलांची संख्या लक्षणीय आहे.या उद्योगांमुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती होत असून,अनेकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होत आहे.

जिल्ह्यातील महिला उद्योजिकांनी विविध क्षेत्रांत आपली छाप पाडली आहे.उपलब्ध आकडेवारीनुसार, ब्युटी पार्लर क्षेत्रात सुमारे ५३ महिला उद्योजिकांनी व्यवसाय सुरू केला आहे.पिठाची गिरणी या उद्योगात सुमारे २५ महिलांनी पुढाकार घेतला असून,मिरची कांडप उद्योगात २७ महिलांनी स्वतःचा व्यवसाय उभारला आहे.याशिवाय मसाला उद्योगात २९, खाद्यप्रक्रिया (फूड प्रोडक्ट्स) क्षेत्रात ८१,तसेच बेकरी,कुक्कुटपालन, सलून,झेरॉक्स व ई-सेवा केंद्र अशा विविध क्षेत्रांतही महिलांचा लक्षणीय सहभाग आहे.या उद्योगांमुळे महिलांना स्वावलंबनाची संधी मिळत असून,स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीला चालना मिळत आहे. महिलांच्या या उद्योजकीय पुढाकारामुळे केवळ त्यांचे वैयक्तिक सक्षमीकरण होत नाही,तर संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होत आहे.ग्रामीण भागातील महिलांनी स्वतःचे उद्योग उभे करून सामाजिक बंधने मोडीत काढत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुरू केली आहे.

जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून बँकांशी समन्वय साधून महिलांना कर्जप्राप्ती सुलभ करण्यात आली आहे.अर्ज प्रक्रिया,मार्गदर्शन आणि पाठपुरावा यामुळे महिलांचा सहभाग सातत्याने वाढत आहे.परिणामी, धाराशिव जिल्हा महिला उद्योजकतेच्या क्षेत्रात राज्यात आदर्श ठरत आहे.एकूणच, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामुळे जिल्ह्यातील महिलांना उद्योग क्षेत्रात नवे दालन खुले झाले असून,महिला सक्षमीकरणातून विकास या संकल्पनेला प्रत्यक्ष बळ मिळाले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त १३५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जिजाऊ रमाई संघर्ष फाऊंडेशनच्या वतीने १३५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत सलग चौथ्या वर्षी हा उपक्रम राबविण्यात आला.यावेळी शहर व परिसरातील नागरीक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिजाऊ रमाई संघर्ष समितीच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त मंगळवार १४ एप्रिल रोजी दुपारी बारा वाजता शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन सांजा रोड राम नगर येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा ज्येष्ठ नेते व्यंकटराव गुंड सांजा जिल्हा परिषद सदस्य प्रदीप घोणे, सांजा पंचायत समिती सदस्य राजदीप गायकवाड, नगरसेवक रवी वाघमारे, माजी नगरसेवक बाळासाहेब काकडे, संस्थेचे अध्यक्ष राज धज,नामदेव राठोड, गफूर शेख,संतोष धावारे, महेश लिमये, हनुमंत सूर्यवंशी,शंकर सूर्यवंशी, मालोजीराजे सूर्यवंशी,ओम सूर्यवंशी, प्रतीक साळवी, नामदेव राठोड, अनिल सूर्यवंशी, उपस्थित होते.यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वही, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी भाजपा नेते व्यंकट गुंड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिजाऊ रमाई संघर्ष फाऊंडेशनचे अध्यक्ष राज धज यांनी केले.सूत्रसंचलन रणजीत राठोड यांनी तर आभार राकेश कचरे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कौतुक माने,कृष्णा भोसले,रणजीत राठोड,वैभव राठोड, अजय माने,परमेश्वर बळी,किरण राऊत, सागर अतकरे यांनी परिश्रम घेतले.

## सामाजिक समता सप्ताहानिमित्त रक्तदान शिबिर; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



धाराशिव (जिमाका) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष,संत गाडगे महाराज जयंतीचे १५० वे वर्ष तसेच महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' ८ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान साजरा करण्यात येत आहे.या सप्ताहानिमित्त जिल्हाभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम,शिबिरे आणि विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या अनुषंगाने आज,१३ एप्रिल रोजी सामाजिक न्याय भवन सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या रक्तदान शिबिरात सहायक आयुक्त समाज कल्याण विभागातील अधिकारी व कर्मचारी,तसेच विविध महामंडळातील कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.यामध्ये जितेंद्र डोंगरे,राहूल पेंढारकर,विवेक गायकवाड,श्रीकृष्ण मोटे,सिद्धार्थ ओव्हाळ,कृष्णा गायकवाड,संदीप पाटील,अक्षय गंगावणे,लक्ष्मण क्षिरसागर,भगवंत कपाळे,आदटराव लक्ष्मण,रतनराव भोसले आदींनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

या कार्यक्रमास सहायक आयुक्त समाज कल्याण सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने आदी उपस्थित होते.

सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित अशा उपक्रमांमुळे समाजात सामाजिक ऐक्य,बंधुता आणि मानवतेची भावना अधिक दृढ होत असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

## जमिन फिर्यादीचे नावे न करता दुसऱ्यांना जमीन विक्री : गुन्हा दाखल

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दत्तात्रय रा. दहिफळ, राजेश, सुनंदा , गणेश , संगीता सर्व रा. अवधुतवाडी ह.मु. भगवंत निवास घर नं ६ सुभाष नगर बार्शी जि. सोलापुर, कैलास रा. दहिफळ, लता, शेनाज दोघे रा. गौर ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.०१.०१.२०२४ रोजी फिर्यादी संदीपान बाबासाहेब मते, वय ५० वर्षे, रा. दहिफळ ता. कळंब जि. धाराशिव यांना जमीन दाखवून जमीन खरेदी करण्यासाठी फिर्यादीने नमुदांनी २,२०,००,००० दिल परंतु नमुदांनी सदर जमिन फिर्यादीचे नावे न करता दुसऱ्यांना जमीन विक्री केली. खरेदी करणारे यांना फिर्यादी सोबत व्यवहार झाल्याचे माहित असताना जमिन खरेदी केली. फिर्यादी व फिर्यादीचा भाउ यांची फसणवुक केली. पैसे परत मागण्यासाठी गेले असता नमुदांनी शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी संदीपान मते यांनी दि.११.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे येरमाळा येथे गुन्हा नोंदवला आहे.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## गरज जागतिक शांततेची!

अमेरिका हा महासत्ताधिश आहे. जगात आपले पर्वस्व राहावे यासाठी प्रयत्न करीत आहे. ट्रम्प यांचे मनसुबे मानवतावादी नाहीत. हिंसात्मक कार्य त्यांनी स्विकारलो आहे. त्यामुळे जगाला वेठीस धरण्याचे काम केले जात आहे. पन्नासटक्के टॅरिफ लावण्याचे काम होत आहे. मनाला येईल तसे वागले जात आहे. कोणताही विचार न करता किंवा आगामी परिणानाम काय होईल यांचा अंदाज न घेता ते बेलाग चालत आहेत. वेळीच रोखले नाही तर आगामी काळात जगावर मोठे संकट येण्याची शक्यता आहे. आज पर्यंत लहान राष्ट्राला आपल्याशी करण्याचा विचार करून सर्वमदत केली गेली आहे. इराण भोवती जे लहान राष्ट्र आहेत त्यांना आपल्याशी करण्यात अमेरिकेला यश आले आहे. ईस्त्राईला कोणाशी वाईटपना नको. वास्तविक इराण व ईस्त्राईल हे मित्र राष्ट्र होते. या दोघात तणाव अमेरिकेमुळे आला आहे. आज ईस्त्राईलमधील मोठ्या शहराची हानी झाली आहे. इराणने बेचिराख शहरे केली आहेत. मुळात अमेरिका हा समोरासमोर लढणारा देश नाही तर शेजारी राष्ट्राचा भूभाग युद्धासाठी वापरणारा देश आहे. ईराण व ईस्त्राईची मोठी हानी झाली. प्रत्यक्षात अमेरिकेची काय हानी झाली. याचा विचार केला पाहिजे. अमेरिका हा ईतर देशाची जमीन वापरत आहे, त्याच प्रमाणे हवेतून युद्ध करणारा देश आहे. समोरासमोर युद्ध करणारा देश नाही. जेवढे काही अधिक युद्धसामुग्रीचा वापर करावयाचा तो हवेतूनच मारा करावयाचा हा त्याचा हातखंड आहे. आता जवळपस ३८ दिवस युद्ध चालल्यानंतर पाकिस्तानच्या मध्यस्तीने अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांसाठी युद्धविराम झाला. प्रत्यक्षात काय होत आहे हे जग पाहात आहे. युद्धविरामानंतर कायमचा तोडगा काढण्यासाठी पाकिस्तानात उच्चस्तरीय शांतता चर्चाही पार पडली. २१ तास चाललेल्या या चर्चेतून निर्णय होण्याची अपेक्षा होती. परंतु, ही चर्चाच निष्फळ ठरली. त्यामुळे इराणविरोधात पुन्हा एकदा युद्ध पेटणार असल्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर अमेरिका इराणच्या सर्वं बंदरांवर वेढा घालणार असून नाकेबंदी शक्यता आहे. असे असतानाच इराण पुन्हा अमेरिकेबरोबर चर्चा करणार का प्रश्न उपस्थित होतो. यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी महत्त्वाचे भाष्य केले आहे. पाकिस्तानमधील शस्त्रसंधीची चर्चा निष्फळ ठरल्यानंतर, इराण पुन्हा चर्चा करणार की नाही, याने काहीच फरक पडत नाही, असे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच स्पष्ट केले. फ्लोरिडावरून परतल्यानंतर मेरीलँडमधील जॉइंट बेस अँड्रयूज येथे पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, ते इराण परत चर्चेला येईल की नाही, याची मला पर्वा नाही. ते परत आले नाहीत, तरी मी समाधानी आहे. ते पुढे म्हणाले, उपराष्ट्रपती जे.डी. वान्स यांच्या नेतृत्वाखाली इस्लामाबादमध्ये झालेल्या शस्त्रसंधी चर्चेदरम्यान इराणने अण्वस्त्र मिळवण्याचे संकेत दिले होते. त्यांना अजूनही अण्वस्त्र हवे आहेत आणि त्यांनी ती बाब परवा रात्री स्पष्ट केली. पण इराणकडे अण्वस्त्र कधीच नसेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. जेव्हा अमेरिकन शिष्टमंडळ इस्लामाबादमध्ये इराणी पथकासोबत चर्चा करत होते, तेव्हाही ट्रम्प यांनी म्हटले होते की, तेहरानसोबत करार झाला काय किंवा नाही झाला काय, त्याने आपल्याला काहीही फरक पडणार नाही. शनिवारी व्हाईट हाऊसबाहेर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले होते, काहीही झाले तरी विजय अमेरिकेचाच असेल. ते पुढे म्हणाले, कदाचित ते करार करतील किंवा करणार नाहीत, त्याने काहीच फरक पडत नाही. अमेरिकेच्या दृष्टिकोनातून विजय आमचाच आहे. असे अमेरिका बोलत आहे. अमेरिकेला शांतात हवी नको तर इराण सोबत युद्ध करून जागतिक अशांत माजविणार असल्याचे उघड दिसून येते. समोरसमोर लढण्याची क्षमता नाही. मिसाईलचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. इराणा सोबत इतर शेजारी राष्ट्राचे नुकसान होत आहे. दुबईमधील जगाचे सर्व कार्यालय असणारे टावर्स इराणकडून उद्धस्थ करण्यात आले आहे. मोठी हानी इस्त्राईलची झाली व होत आहे. अमेरिका पोसत असलेल्या शेजारी राष्ट्र हे इराण लक्ष्य करीत आहे. आता पर्यंत अमेरिका असो इराण लहान-लहान मिसाईल सोडत आहेत. महाधमाका अजून केला नाही तरी मोठा विध्वंसक झालेला पाहावयात मिळत आहे. इराणने जे अमेरिकेला शेजारी राष्ट्रमदत करीत आहेत त्याच्यावरही मिसाईल डागले आहेत. जशासतसे उत्तर देत आहे. पाकिस्तान हा दहशदवादी पोसणारा ईस्लामिक राष्ट्र असून तो अमेरिकेला साथ देत आहे. वास्तविक सत्तरच्या आसपास ईस्लामिक राष्ट्र असून अमेरिकेच्या पायाशी लोळत आहेत. हे मोठे दुर्दैव आहे. इराणाला आतून काही अमेरिकेच्याविरोधात असणारे मदत करीत असतील उघड मात्र समोर आले नाही. चीन असो किंवा रशिया यांची भुमिका गुलदस्त्यात आहे. वास्तविक युद्धाबाबत रणनिती बाहेर येत नसते प्रत्यक्षात कारवाई होत असते. त्यामुळे भारत असो किंवा अन्य देश असोत ट्रम्प जो पर्यंत आहेत तो पर्यंत विश्वास न ठेवणे काळाची गरज आहे. मुळात ट्रम्प हे गैरविश्वासी आहेत. त्याना पाकिस्तान प्यारा आहे. जगात आतंगवाद पोसणारा म्हणून जगजाहीर आहे. तो जगात अतिरेकीपोसून, प्रशिक्षण देवून दहशद घडवित आहे ही बाब लपून नसताना त्याला अमेरिका मदत करतो म्हणजे तोही त्याच तोडीचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आज मर्यादित युद्ध आहे. छोटे राष्ट्राचे नुकसान होत आहे. यात चीन असो किंवा रशिया प्रत्यक्षात किंवा अप्रत्यक्षात हात असेल मात्र ज्यावेळी प्रत्यक्षात सहभाग असेल त्यावेळी मोठी समस्या जगात निर्माण होणार आहे. आज भारताने अनेक बाबीवर मात करून वाटचाल सुरू केली आहे. भारतात अजूनही गॅससिलेंडर बाबत सुसूत्रता आली नाही. त्यामुळे युद्ध तसे कोणालाही परवडणारे नाही. आज अमेरिका मिसाईल सोडत आहेत. याची किंमत लाखो डॉलरची असू शकते. केवळ हवाईयुद्ध चालू आहे. दोघेही हवाईमिसाईल युद्ध खेळत आहेत. यात लाखोंचे हानी होत आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर ट्रम्प हाटाओ बरोबर अमेरिकेत सुद्धा या बाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी उठाव करण्याची गरज निर्माण झाली आहे. आवश्यकता आहे ती जागतिक शांततेची हे लक्षात ठेवले पाहिजे.

# स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या निधनाने भारतीय संगीतातील चैतन्य हरपले



**सुरांच्या छायेत तेज उमलले,**
**अष्टपैलू संगीत विश्व उजळले;**
**चिरतरुण ते चैतन्य मावळले,**
**संगीताचे थोर सुवर्णयुग संपले.**

भारतीय संगीत क्षेत्रातील अष्टपैलूत्वाचा महामेरू आणि सुरांच्या जादुगार स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या निधनाने एका देदीप्यमान सुवर्णयुगाचा अंत झाला आहे. लतादीदींच्या सुरांच्या सावलीत स्वतः चे तेजस्वी अस्तित्व निर्माण करणाऱ्या आशाताईंनी ८ दशकांच्या प्रवासात २० हून अधिक भाषांमध्ये १२ हजारहून अधिक गाणी अजरामर केली. पिया तू अब तो आजा मधील ठसका असो वा उमराव जान मधील गझलेचा नजाकत; प्रत्येक सुराला त्यांनी मानवी भावनांच्या छटा दिल्या. शून्यातून स्वरांचे विश्व निर्माण करणारी ही चिरतरुण आशा आज मावळली असली, तरी त्यांचा झंझावाती आवाज आणि प्रयोगशील वृत्ती संगीत विश्वात सदैव चैतन्य देत राहील. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी वयाच्या ९२ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. त्यांच्या निधनाने केवळ मंगेशकर कुटुंबच नाही, तर संपूर्ण जागतिक संगीत विश्वात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

आशाताईंचा प्रवास सोपा नव्हता. ज्या काळात थोरल्या भगिनी भारतरत्न लता मंगेशकर यांच्या सुरांचा वटवृक्ष भारतीय सिनेसृष्टीवर पूर्णपणे विस्तारलेला होता, त्याच काळात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे हे एक शिवधनुष्य पेलण्यासारखे होते. लतादीदींच्या सुरांच्या सावलीत न हरवता, त्यांनी स्वतःचं तेज निर्माण केलं. लहान वयात आलेली कौटुंबिक जबाबदारी, वैयक्तिक आयुष्यातील वादळे (कमी वयातलं लग्न, मुलांची जबाबदारी) आणि संघर्षातून तावून सुलाखून निघालेला त्यांचा सुवर्णस्वर म्हणजे आशा भोसले नावाचं एक स्वतंत्र साम्राज्य ठरलं.

आशाताई म्हणजे केवळ एक गायिका नव्हत्या, तर त्या सुरांच्या जादुगार होत्या. त्यांच्या आवाजातील रेंज थक्क करणारी होती. एका बाजूला पिया तू अब तो आजा मधील मादकता आणि पाश्चात्य शैलीचा ठसका, तर दुसऱ्या बाजूला उमराव जान मधील गझलेचा नजाकत आणि आर्तता. खय्याम यांच्या संगीतात दिल चीज क्या है गाताना त्यांनी सिद्ध केलं की, त्या केवळ पॉपपुरत्या मर्यादित नाहीत, तर अभिजात संगीतावरही त्यांची तितकीच हुकूमत आहे. शास्त्रीय ते पॉप आणि लावणी ते गझल; सुरांच्या प्रत्येक प्रांतात त्यांनी अढळ पद मिळवले.

एस. डी. बर्मन यांच्यापासून ए. आर. रहमानपर्यंत आणि ब्रेट लीपासून लेस्ली लुईसपर्यंत आशाताईंनी प्रत्येक पिढीच्या संगीताशी जुळवून घेतले. त्यांच्या कारकिर्दीला कलाटणी देणाऱ्या ओ. पी. नय्यर आणि आर. डी. बर्मन या जोड्यांनी त्यांच्यातील प्रयोगशील वृत्तीला जगासमोर आणले. वयाची नव्वदी ओलांडली तरी आवाजातलं चिरतरुण चैतन्य न हरवलेली ही गायिका शेवटपर्यंत नव्या प्रयोगांसाठी सज्ज होती.

हिंदीत जागतिक कीर्ती मिळवूनही मराठी मातीशी त्यांची नाळ घट्ट होती. रेशमाच्या रेघांनीमधील लावणीचा ठसका असो, केव्हा तरी पहाटे मधील विरह असो वा विठ्ठला तू वेडा कुंभार मधली भक्ती; आशाताईंनी मराठी संस्कृतीच्या सर्व छटा आपल्या सुरात उतरवल्या. गदिमा, सुरेश भट आणि शांता शेळके यांच्या शब्दांना त्यांनी दिलेला न्याय मराठी मनावर कायमची भुरळ घालणारा ठरला. सुरांच्या साम्राज्यातली ही राणी खऱ्या आयुष्यात कमालीची साधी होती. त्या केवळ एक महान गायिका नव्हत्या, तर एक उत्कृष्ट सुगरण, क्रिकेटची चाहती आणि आपल्या मुलांची-नातवंडांची काळजी घेणारी हळवी माता होत्या. ज्या ताकदीने त्या सुरांशी खेळायच्या, त्याच आपुलकीने त्या स्वयंपाकघरातही वावरायच्या. इतके यश आणि मान-सन्मान (पद्मविभूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार, महाराष्ट्र भूषण) मिळवूनही त्यांचे पाय कायम जमिनीवरच होते.

आज आशाताई आपल्यात नाहीत, हे वास्तव स्वीकारणे कठीण आहे. त्यांनी केवळ हिंदीच नाही, तर अनेक भारतीय भाषांमध्ये गाणी गाऊन भारतीय संस्कृतीला समृद्ध केले. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीतातील ऊर्जा देणारा आवाज शांत झाला आहे. पण जोपर्यंत या जगात संगीत राहील, जोपर्यंत एखादी रात्र अजुनी तरुण असेल आणि जोपर्यंत कुणी आपल्या प्रियकराला जिवलगा म्हणून साद घालेल, तोपर्यंत आशा भोसले यांचा हा दैवी आवाज आपल्या आसपास दरवळत राहील.

शून्यातून स्वरांचं विश्व निर्माण करणारी आशा आज मावळली असली, तरी त्यांच्या गाण्याच्या रूपाने त्या प्रत्येक श्वासात अजरामर राहतील.।। स्वरसम्राज्ञी आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली!

----------



**राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**
**रा.करकट्टा ता.जि.लातूर**
**मोबाईल ९८९०५७७१२८**

# मुक्तांगण स्कुल मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**लातूर/प्रतिनिधी :** विशालनगर येथील साई मंदिर समोरील मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले.

शाळेच्या शिक्षिका प्रणिता सुरवसे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली.

शाळेतील शिवांश भागवत राचमाले, रिषभ श्रीकांत चाटे, प्रतिक रमेश गोरे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून शाळेतील विद्यार्थी, शिक्षिका यांनी अभिवादन केले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# दयानंद विज्ञानमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

### डॉ.युवराज सारणीकर,डॉ.आण्णाराव चौगुले व डॉ.महादेव पंडगे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न,बोधिसत्व,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.त्या निमित्ताने दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी जयंती व पुस्तक प्रकाशनाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,दीन दलितांचे उद्धारक,मानवतेचे पुरस्कर्ते,क्रांतिसूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.तसेच त्यांच्या हस्ते जयंतीचे औचित्य साधून रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर यांच्या ऑरगॅनिक अँन्ड इनऑरगॅनिक केमिस्ट्री , औद्योगिक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आण्णाराव चौगुले यांच्या एक्सपेरिमेंटल अप्रोच फॉर द सिंथेसिस ऑफ मेटल कॉम्प्लेक्स अँड ॲप्लिकेशन्स आणि डॉ.महादेव पंडगे यांच्या पुस्तकाचेही विमोचन करण्यात आले.विशेष बाब म्हणजे दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकांनी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मूळ संकल्पनेतून व मार्गदर्शनानुसार नवीन शैक्षणिक धोरणावर (एनईपी) आत्तापर्यंत एकूण १८ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

यावेळी सचिव रमेश बियाणी असे म्हणाले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य आदर्श व प्रेरणादायी असून त्यांचा आदर्श जीवनात घ्यावा.प्रत्येकांनी आपल्या आयुष्यात वाचन,मनन,चिंतन करून दर्जेदार पुस्तकांची नवनिर्मिती करावी.रसायनशास्त्र, औद्योगिक रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र अशा अनेक विषयांतील पुस्तकांची निर्मिती झाली तर त्या पुस्तकांचा फायदा विद्यार्थ्यांना निश्चितच होईल.तसेच जीवनामध्ये प्रत्येकांनी विज्ञानवादी दृष्टिकोन जर स्वीकारला तर अंधश्रद्धांचे समाजजीवनातून कायमचे समूळ उच्चाटन होईल, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य अशोक पाटील, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी,पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांच्यासह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मेघा पंडित यांनी केले तर आभार प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी मानले.

## सावधान! कोबीप्रमाणे 'या' ५ भाज्यांमध्ये लपले असतात धोकादायक किटक; चुकूनही करू नका ही चूक

भाज्या सामान्यत: निरोगी असतात, मात्र, काही भाज्या शरीराला गंभीर हानी पोहोचवतात? हे तुम्हाला घाबरवण्यासाठी अजिबात नाही, फक्त तुमचे लक्ष वेधण्यासाठी आहे. कारण भाज्या कधीकधी आरोग्याला नुकसान करू शकतात. विशेषत: जेव्हा त्या व्यवस्थित शिजवल्या जात नाहीत किंवा धुतल्या जात नाहीत. आपण काही भाज्या सॅलड म्हणून कच्च्या खातो, परंतु प्रत्येक भाज्या कच्च्या खाण्यासाठी नसतात. यापैकी अनेक भाज्यांमध्ये धोकादायक बॅक्टेरिया, टेपवर्म असू शकतात, ज्याम ुळे आतड्यांसंबंधी गंभीर समस्या उद्भवू शकतात. इतकेच नाही तर काही बॅक्टेरिया मेंदूवरही परिणाम करू शकतात. इंस्टाग्राम पोस्टमध्ये, आरोग्य तज्ञ डिंपल जांगरा यांनी अशा भाज्यांबद्दल सांगितलं आहे, ज्या कधीही कच्च्या खाऊ नयेत.

अळूची पानं: अळूच्या पानांपासून विविध प्रकारचे पदार्थ तयार केले जातात. परंतु, अळूची पाने कधीही कच्ची खाऊ नयेत. त्यांच्या पृष्ठभागावर अनेक धोकादायक बॅक्टेरिया, रोगजनके आणि टेपवर्मची अंडी असू शकतात, जी धुतल्यानंतरही तिथेच राहतात. त्यांना कच्चे खाल्ल्याने आतड्यांसंबंधी गंभीर समस्या उद्भवू शकतात. म्हणून ते खाण्यापूर्वी ते उकळणे, ब्लँच करणे किंवा वाफवणे चांगले.

पालक आणि केळची पानं: आरोग्य तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, पालक आणि केळची पाने धोकादायक रोगजनक, टेपवर्म अंडी, अळ्या आणि परजीवी देखील ठेवू शकतात जे तुमच्या रक्तप्रवाहात प्रवेश करू शकतात आणि गंभीर आरोग्य समस्या निर्माण करू शकतात. इतकेच नाही तर त्यामध्ये ऑक्सलेटचे प्रमाण देखील जास्त असते, म्हणून जर तुम्ही ते जास्त प्रमाणात खाल्ले तर तुम्हाला किडनी स्टोनचा धोका असू शकतो. म्हणून खाण्यापूर्वी ते हलके उकळणे, वाफवणे किंवा शिजवणे चांगले.

पत्ताकोबी: पत्ताकोबीमध्ये टेपवर्म अंडी होण्याचा धोका सर्वाधिक असतो. प्रत्यक्षात कोबीचा आकार असा असतो, ज्यामध्ये अंडी सुरक्षित असतात. जर तुम्ही ती कच्ची खाल्ली तर ही अंडी तुमच्या रक्तात जाऊ शकतात आणि तुमच्या मेंदूत देखील जाऊ शकतात. यामुळे अपस्मार आणि ब्लॅकआउट्स सारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. म्हणून कोबी हलके शिजवल्यानंतर नेहमीच खाणे चांगले.

शिमला मिरची: डिंपल स्पष्ट करतात की शिमला मिरचीमध्ये असलेल्या बिया अगदी टेपवर्मच्या अंड्यांसारखे दिसतात आणि कधीकधी ते अंडी देखील असू शकतात. माती, खत, पाणी इत्यादी मिसळल्यामुळे हे अनेक वेळा घडू शकते. म्हणून शिमला मिरची खाण्यापूर्वी त्याच्या बिया काढून टाका, नंतर पाण्याने चांगले धुवा आणि खा. त्यापूर्वी ते शिजवून घ्या.

वांगी: वांग्यांमध्ये विविध प्रकारचे परजीवी, अंडी, ओवा आणि सिस्ट देखील असू शकतात. बहुतेक सांस्कृतीमध्ये वांगी खाणं पूर्ण बंद आहे कारण वांग्यामध्ये सर्वप्रकारच्या गोष्टी जास्त असतात. म्हणून वांग्याची भाजी करताना ते चांगले उकडून घेणे किंवा स्टीम करणे गरजेचं आहे.

## बीजोत्पादनातून महिला सक्षमीकरणाचा 'जालना पॅटर्न'

शेती हा कष्टाचा व्यवसाय, त्यातही कोरडवाहू शेती म्हणजे नशिबाचा खेळ. पण याच कोरडवाहू मातीत जर जिद्द आणि आधुनिक तंत्रज्ञानाची पेरणी केली, तर समृद्धीचे पीक घेता येते, हे जालन्यातील प्रयोगशील महिला शेतकरी मोनिका पांडुरंग शर्मा यांनी सिद्ध करून दाखवले आहे. पारंपरिक शेतीला फाटा देत त्यांनी बीजोत्पादनाचे शास्त्रशुद्ध तंत्र आत्मसात करून आज एक यशस्वी उद्योजक शेतकरी म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ब्रिडर सीड्सला ३० टक्के, तर फाउंडेशन बियाण्याला २० टक्के अतिरिक्त दर मिळतो, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते. तसेच खरीपानंतर रब्बी हंगामात त्या हरभऱ्याच्या बीडीएन ७९८ आणि विश्वराज वाणाचे ४० एकरवर बीजोत्पादन घेतात. याप्रमाणे जिद्द आणि तंत्रज्ञानाची जोड देत जालन्याच्या मोनिका शर्मा यांनी बीजोत्पादनातून सुवर्ण भरारी घेतली आहे.

**६० एकरवर प्रगत शेतीचे प्रयोग :-**

जालना तालुक्यातील खोडेपुरी येथील मोनिका शर्मा यांची ६० एकर शेती आहे. एकेकाळी केवळ घरगुती उत्पादनासाठी शेती करणाऱ्या शर्मा यांनी आता महाबीजच्या सहकार्याने बीजोत्पादनाकडे लक्ष केंद्रित केले आहे. खरीप हंगामात त्यांनी तब्बल ५० एकर क्षेत्रावर सोयाबीनच्या आंबा या वाणाचे बीजोत्पादन घेतले. योग्य नियोजन आणि परिश्रमामुळे त्यांना ३५० क्विंटल बियाण्यांचे दर्जेदार उत्पन्न मिळाले आहे.

**स्वत: चालवतात ट्रॅक्टर आणि अवजारे :-**

ग्रामीण भागात आजही महिलांना शेतीतील दुय्यम कामांसाठी ओळखले जाते. मात्र, मोनिका शर्मा यांनी हा समज मोडीत काढला आहे. त्या स्वत: ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, बीबीएफ पेरणी यंत्र आणि रिपर यांसारखी सर्व प्रगत यंत्रसामग्री आणि अवजारे लिलया चालवतात. मजुरांच्या टंचाईवर मात करण्यासाठी आणि वेळेची बचत करण्यासाठी त्यांनी यांत्रिकीकरणाचा आधार घेतला आहे.

**रासायनिक खतांना गोठ्याची जोड :-**

मोनिका शर्मा यांच्याकडे ५० देशी गाईंचा गोठा आहे. या गाईंच्या शेणखतामुळे त्यांच्या शेतीची सुपिकता वाढली असून खताचा खर्च मोठ्या प्रमाणात वाचला आहे. शाश्वत शेतीसाठी त्या हिरवळीचे खत (सनहेम्प), कंपोस्ट आणि आंतरपिकांचा वापर करतात. पिकांवरील कीड नियंत्रणासाठी त्या आयपीएम पद्धतीचा वापर करून निमार्क, फेरोमोन सापळे आणि पक्षी थांबे यांसारख्या पर्यावरणपूरक उपाययोजनांना प्राधान्य देतात.

**बीजोत्पादनाचे शास्त्र आणि आर्थिक गणित :-**

बीजोत्पादन हे सामान्य शेतीपेक्षा कठीण असते. यात म हाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे कडक नियम पाळावे लागतात. मोनिका शर्मा सांगतात की, बियाण्यांचा दर्जा राखण्यासाठी अधिकाऱ्यांच्या निगराणीत टॅगिंग आणि सीलिंगचे काम केले जाते. यामुळे बियाण्याला विश्वासार्हता मिळते.

**महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श :-**

कोरडवाहू शेतीतील महिलांचे कष्ट अनेकदा दुर्लक्षित राहतात. मात्र, सुधारित वाण, कृषी विद्यापीठांचे मार्गदर्शन आणि कष्टाची तयारी असेल, तर महिला शेतीतून आर्थिक क्रांती घडवू शकतात, हे मोनिका शर्मा यांच्या यशोगाथेवरून स्पष्ट होते. आज त्या परिसरातील अनेक महिला शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरत आहेत.

शेतीत केवळ कष्ट करून चालत नाही, तर त्याला नियोजनाची आणि तंत्रज्ञानाची जोड द्यावी लागते. महाबीज आणि कृषी विभागाच्या मार्गदर्शनामुळे मला बीजोत्पादनात यश मिळाले. महिलांनी आधुनिक अवजारे चालवायला शिकले, तर शेती अधिक फायदेशीर होऊ शकते.

**- मोनिका पांडुरंग शर्मा,**
**प्रयोगशील महिला शेतकरी, जालना**

# निधीचा बहाणा; हायकोर्टाने फटकारले!

मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातील एका निवृत्त महिला कर्मचार्याने सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व अन्य लाभ मिळत नसल्याने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने याबाबत जाब विचारला तेव्हा नेहमीप्रमाणे निधीची अडचण असल्याने पेन्शन देता येत नसल्याचे छापील उत्तर महापालिकेने दिले. प्रत्येक गोष्टीसाठी निधीची अडचण पुढे केली जात असल्यामुळे संतप्त झालेल्या न्यायमूर्तींनी सरकारला कडक शब्दांत फटकारले. सातव्या वेतन आयोगानुसार शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचार्यांना निवृत्तीवेतन तसेच अन्य लाभ देण्यास राज्य सरकारकडे पैसे नसतील, तर महापालिकेच्या कार्यालयातील खुर्च्या-टेबल विकून पेन्शन द्या. निधी नाही ही सबब यापुढे चालणार नाही. पेन्शनसाठी पैसे नसतील तर लाडकी बहीण योजनांसारख्या योजनांवर खर्च करणे थांबवा, अशा शब्दांत न्यायालयाने सरकारची खरडपट्टी काढली. अतिरिक्त आयुक्तांना याबाबत स्पष्टीकरण देण्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देशही दिले. सरकारच्या पडताळणीत लाडकी बहीण योजनेतील ७१ लाख लाभार्थी अपात्र ठरले असून, या अपात्र लाभार्थींना सरकारने आतापर्यंत तब्बल २१ हजार कोटी रुपये दिल्याचे समोर आल्याने आधीच टीकेची झोड उठलेली असताना न्यायालयाने फटकारल्यामुळे हा विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला महाराष्ट्रात मोठा दणका बसला होता. ४८ पैकी ३१ जागा महाविकास आघाडीने जिंकल्या होत्या. त्यामुळे २०२२ मध्ये शिवसेना फोडून सत्त-ेत आलेल्या महायुतीचे धाबे दणाणले होते. लोकसभा निवडणुकीनंतर चारच महिन्यांनी विधानसभेची निवडणूक होणार होती व हेच वातावरण राहिले तर हातातली सत्ता जाणार याची जाणीव महायुतीच्या नेत्यांना झाली होती. त्यामुळे लोकसभेनंतर लोकप्रिय निर्णयाचा धडाका सरकारने लावला होता. मध्यप्रदेशात गेम चेंजर ठरलेल्या लाडकी बहीण योजनेसह अनेक योजना जाहीर केल्या. या चार महिन्यांत महायुती सरकारने सरकारी तिजोरीवर तब्बल ९० हजार कोटींचा आर्थिक भार टाकणारे निर्णय घेतले. या निर्णयांमुळे महायुतीला फायदा झाला. विक्रमी यश मिळवून सत्ता कायम राखली. राजकारण साधले; पण अर्थकारणाचे १२ वाजले होते. लोककल्याणकारी राज्यात समाजातील आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागे असलेल्या समाजाला पुढे आणण्यासाठी, त्यांना आधार देऊन त्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी निर्णय घेतले गेले तर त्यात चुकीचे काहीच नाही; पण हे निर्णय गरजवंतांसाठीच असले पाहिजेत. स्वतःच्या राजकीय गरजेसाठी ज्यांना आर्थिक मदतीची गरज नाही अशा लोकांनाही आपल्या



राजकारणासाठी प्रलोभन दाखवण्याची भूमिका अनेकदा घेतली जाते. लोकसभा निवडणुकीनंतर जाहीर केलेल्या योजनांच्या लाभार्थी निवडताना तत्कालीन सरकारने सर्व चाळण्या बाजूला ठेवल्या होत्या. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेक निकष ठरवले गेले होते; परंतु त्याची काळजीपूर्वक पडताळणी न केल्याने तब्बल ७१ लाख लाभार्थी अपात्र ठरले आहेत. या योजनेमुळे महायुतीला सत्ता मिळाली; पण सत्ता आल्यानंतर तो भार सरकारला पेलवत नव्हता. त्यामुळे अपात्र लाभार्थींना बाजूला करण्यासाठी छाननी सुरू झाली. पहिल्या चाचणीत तब्बल २६ लाख लाभार्थी अपात्र ठरले. अनेक पुरुषांनी, सरकारी सेवेत असलेल्या मंडळींनी निकषात बसत नसतानाही योजनेचा लाभ घेतल्याचे उघड झाले. आता ई-केवायसी करताना ७१ लाख लाभार्थी अपात्र ठरले आहेत. या लोकांनी योजना सुरू झाल्यापासून थोडे थोडके नाही तब्बल २१ हजार कोटी रुपये घेतले आहेत. लाभार्थी अपात्र ठरले तरी पैसे परत मागायचे नाही असे सरकारने ठरवले आहे. सरसकट नाही तरी महिलांचे बनावट नाव धारण करून पैसे लाटणार्या पुरुषांकडून, आपण या योजनेसाठी पात्र नाही आहोत हे माहिती असूनही लाभ घेणार्या सरकारी कर्मचारी यांच्याकडून तरी दिलेली रक्कम व्याजासह वसूल करणे आवश्यक होते; परंतु तो ही निर्णय घेण्याचे टाळले गेले. निवडणुकीत मते मिळवण्यासाठी ही योजना आणली गेली, अपात्र लोकांनाही सरकारी तिजोरीतून पैसे वाटून मते मिळवली असा आरोप विरोधक सुरुवातीपासूनच करत होते. त्याला आता आकडेवारीचा आधार मिळाला आहे. अपात्र लाभार्थींची मते मिळवून सत्तेवर आलेल्यांना पात्र कसे म्हणायचे असा उपरोधिक सवालही केला जात आहे. या पार्श्वभूमीवर मागच्या आठवड्यात मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला लाडकी बहीण योजनेवरून तीव्र शब्दांत फटकारले. एकीकडे सरकार आर्थिक अडचण असल्याचे सांगते, तर दुसरीकडे लाडकी बहीण सारख्या खर्चिक योजना राबवल्या जातात. आर्थिक प्राधान्यक्रम ठरवताना मूलभूत जबाबदार्या दुर्लक्षित करून नवीन योजनांवर खर्च करणे योग्य आहे का, असा थेट सवाल करताना, गरज पडल्यास अशी योजना बंद करण्यावरही विचार व्हावा, असे स्पष्ट मत मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. उद्या अपात्र लोकांना दिलेल्या लाभाबद्दल कोणी न्यायालयात गेले तर न्यायालय काय भूमिका घेईल ते बघावे लागेल.

बिहारनंतर आता आसाममध्येही लाडकी फॉर्म्युला! लाडकी बहीण योजनेमुळे पडणार्या आर्थिक भाराचा अनुभव मध्यप्रदेश व महाराष्ट्रात आ-लेला असतानाही नंतर बिहार व आता आसाम विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी हाच निर्णय घेतला गेला. निवडणुकीआधी लाभार्थी महिलांच्या खात्यात १९ हजार रुपये जमा झाले आहेत. आसाममधील भाजपा सरकारच्या अरुणोदय योजनेअंतर्गत प्रति महिना १२५० रुपये मिळतात. या योजनेच्या ४० लाख लाभार्थी महिला आहेत. आसाम सरकारने मागच्या महिन्यात लाभार्थी महिलांच्या खात्यात चार महिन्यांच्या थकलेल्या हप्त्यांचे ५ हजार व बिहू गिफ्ट म्हणून ४ हजार असे एकूण नऊ हजार रुपये जमा करणे सुरू केले आहे. याशिवाय 'मुख्यमंत्री महिला उद्यमिता अभियान' ही योजना सुरू केली आहे. या योजनेत महिलांना शेतीसाठी बियाणे खरेदी करण्यासाठी ८५ हजार रुपये तीन वर्षांच्या कालावधीत दिले जातात. या योजनेच्या २८ लाख ५० हजारांहून अधिक महिला लाभार्थी आहेत.

त्यांच्या खात्यात दहा हजार रुपये जमा करणे आसाम सरकारने सुरू केले आहे. आसाममध्ये अनेक योजनांअंतर्गत महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा होत आहेत. अरुणोदय योजनेअंतर्गत दिले जाणारे १२५० रुपये निवडून आल्यानंतर ३००० रुपये करण्याचे आश्वासन भाजपाकडून देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसाठी 'जीवन प्रेरणा' योजना सुरू करण्यात आली असून या अंतर्गत पदवीधर विद्यार्थ्यांना प्रति महिना २ हजार ५०० रूपये दिले जातात. चहाच्या मळ्यात काम करणार्या ६.८ लाख कामगारांच्या खात्यात ५ हजार रुपये एकदाच जमा केले गेले. महाराष्ट्रात यशस्वी झा-लेला फॉर्म्युला तिथे राबवला जातो आहे. युद्धात आणि राजकारणात सगळं माफ असतं. दुटप्पी लोकांना उघडे पाडून माघार!

अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघासोबतच राहुरी मतदारसंघाची पोटनिवडणूक २३ एप्रिलला होत आहे. बारामतीत विद्यमान उपमुख्यमंत्री व स्व. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उमेदवार आहेत. तर राहुरीत स्वर्गीय आमदार शिवाजी कर्डिले यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले हे भाजपचे उमेदवार आहेत. सुनेत्रा पवार यांची निवड बिनविरोध व्हावी यासाठी मुख्यमंत्र्यांनी बरेच प्रयत्न केले. काँग्रेसने इथे उमेदवार दिला होता; परंतु नंतर स्वतः शरद पवार यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्य नेत्यांनी केलेली विनंती मान्य करून आपला उमेदवार मागे घेतला; परंतु अनेक अपक्ष रिंगणात असल्याने निवडणूक होत आहे. एखाद्या विद्यमान आमदाराचे निधन झाले व त्यांच्या कुटुंबातील कोणी व्यक्ती निवडणूक लढवत असेल तर अन्य पक्षांनी उमेदवार देऊ नये अशी भूमिका काहीवेळा घेतली जाते. काँग्रेसला याची आठवण करून देणार्या शरद पवार गटाने राहुरीत मात्र अक्षय कर्डिले यांच्या विरोधात उमेदवार उभा केला आहे. महाराष्ट्राच्या परंपरेची व संस्कृतीची महती सांगणार्या भाजपाने २०२१ ला पंढरपूर, देगलूर व कोल्हापूरच्या पोटनिवडणुकीत आपले उमेदवार उभे केले होते. पंढरपूरमध्ये भारत भालके यांच्या विरोधात भाजपने समाधान आवताडे यांना उमेदवारी देऊन भागीरथ भालके यांचा पराभव केला होता. २०२२ मध्ये कोल्हापूर उत्तरच्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचे आमदार चंद्रकांत जाधव यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी जयश्री जाधव यांच्या विरोधात भाजपने सत्यजित कदम यांना रिंगणात उतरवले होते; परंतु अल्प फरकाने त्याचा पराभव झाला होता. दे-गलूर मतदारसंघात दिवंगत आमदार रावसाहेब अंतापूरकर यांचे पुत्र जितेश अंतापूरकर यांच्या विरोधात सुभाष सबणे यांना उमेदवारी दिली गेली होती. काँग्रेसने बारामतीत आपल्या उमेदवाराचा आर दाखल करून या सर्व निवडणुकांची आठवण भाजपाला दिली. २०१५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी गृहमंत्री आर.आर. पाटील यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी सुमनताई पाटील यांच्या विरोधात प्रमुख राजकीय पक्षांकडून उमेदवार दिला गेला नव्हता.२०१८ मध्ये काँग्रेसचे नेते पतंगराव कदम यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांचे चिरंजीव विश्वजीत कदम बिनविरोध निवडून आले होते. दोन्ही बाजूंची उदाहरणे असताना यातील महाराष्ट्राची संस्कृती कोणती असा प्रश्न निर्माण होणे स्वभाविक आहे. काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेताना नेत्यांची दुटप्पी भूमिका समोर तर आणलीच; पण बारामतीच्या जागेवर पुढच्या निवडणुकीसाठी आपला रुमाल टाकून दावा सांगण्याची सोय करून ठेवली आहे.

**-अभय देशपांडे**

नॉनव्हेज प्रेमींसाठी खास! घरी आलेल्या पाहुण्यांसाठी घरीच बनवा

## स्ट्रीट स्टाईल कुरकरीत चिकन लॉलीपॉप

कुरकुरीत चवीचा चिकन लॉलीपॉप एक लोकप्रिय इंडो-चायनीज स्टार्टर आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत ही डिश सर्वांच्याच आवडीची आहे, अशात यंदा विकत कशाला घरीच तयार करा चिकन लॉलीपॉप!

चिकन लॉलीपॉप एक स्टार्टर्सचा प्रकार आहे.

स्ट्रीटपासून हॉटेलपर्यंत हा पदार्थ आवर्जून मेन्यूमध्ये ड केला जातो.

कुरकुरीत चवीचा हा चिकन लॉलीपॉप घरी देखील बनवता येऊ शकतो.

आजकाल रस्त्यावर मिळणारे चटकदार आणि मसा-लेदार पदार्थ सगळ्यांनाच खूप आवडतात. त्यातही चिकन लॉलीपॉप हा एक असा स्टार्टर आहे, जो लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्या मनात खास जागा बनवतो. बाहेरून कुरकुरीत आणि आतून रसाळ असलेले हे चिकन लॉलीपॉप खाण्याचा अनुभव खूपच वेगळा असतो. हॉटेल किंवा स्टॉलवर मिळणाऱ्या त्या खास चवीमागे काही सोप्या पण महत्त्वाच्या टिप्स असतात, ज्यामुळे त्याची चव अगदी परफेक्ट येते.

घरच्या घरी स्ट्रीट स्टाईल चिकन लॉलीपॉप बनवणं काही अवघड नाही. योग्य मॅरिनेशन, मसाल्यांचा बरोबर समतोल आणि योग्य पद्धतीने तळणं या गोष्टी लक्षात घेतल्या तर तुम्हीही अगदी बाहेरसारखीच चव घरात तयार करू शकता.

ही रेसिपी खास करून पार्टी, गेट-टुगेदर किंवा संध्याकाळच्या स्नॅक्ससाठी एकदम परफेक्ट आहे. चला याची रेसिपी जाणून घेऊया.

साहित्य:५०० ग्रॅम चिकन विंग्स (लॉलीपॉप कट)
२ टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट
१ टेबलस्पून लाल तिखट
१ टीस्पून मिरपूड
१ टीस्पून सोया सॉस
१ टीस्पून व्हिनेगर (ऑप्शनल)
२ टेबलस्पून कॉर्नफ्लोअर
२ टेबलस्पून मैदा
१ अंडे
मीठ चवीनुसार
तेल तळण्यासाठी

भाजी काय बनवावी सुचत नाही? मग १० मिनिटांमध्ये बनवा कांद्याची कुरकुरीत सुकी चटणी, साध्या जेवणाला लागेल रंगतदार चव

कृती: सर्वप्रथम चिकन लॉलीपॉप स्वच्छ धुवून पाणी निथळू द्या.

एका भांड्यात चिकन घेऊन त्यात आलं-लसूण पेस्ट, लाल तिखट, मिरपूड, मीठ, सोया सॉस आणि व्हिनेगर घालून चांगलं मिक्स करा. हे मिश्रण किमान ३० मिनिटे मॅरिनेट होण्यासाठी बाजूला ठेवा.

आता त्यात अंडे, कॉर्नफ्लोअर आणि मैदा घालून पुन्हा एकदा नीट मिसळा.

कढईत तेल गरम करा आणि मध्यम आचेवर चिकन लॉलीपॉप सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या.


तळलेले लॉलीपॉप टिश्यू पेप-रवर काढा, जेणेकरून अतिरिक्त तेल निघून जाईल.

गरमागरम चिकन लॉलीपॉप हिरव्या चटणी किंवा सॉसबरोबर सर्व्ह करा.

जास्त कुरकुरीतपणा हवा असेल तर थोडं राईस फ्लोअर घालू शकता.

लाल रंगासाठी थोडासा फूड कलर वापरू शकता (ऑप्शनल).

अधिक स्ट्रीट स्टाईल फ्लेवरसाठी शेवटी थोडा चाट मसाला शिंपडा.



## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

### वैवाहिक जीवन सुधारण्यासाठी विशेष टिप्स




ग्रीक जोडपे एका वर्षात सरासरी १३८ वेळा वैवाहिक सुख घेतात. तर जपानी जोडपे सगळ्यात कमी म्हणजे ४५ वेळा वैवाहिक सुख घेतात. पुरुषांच्या लिंगातून वीर्य निघण्याची गती ३६.९ कि.मी. प्रति तास इतकी असते, जो उसेन बोल्टचा १०० मीटर चा रेकॉर्ड तोडण्यासाठी पुरेसे आहे. एका वयस्कर पुरुषांच्या अंडकोषात एवढे शुक्राणू असतात कि त्यांना ४०४ मीटर पर्यंत पसरून ठेऊ शकतात. राशी आणि वैवाहिक जीवन बद्दल माहीती एका छोट्या कैप्सूल मध्ये इतके शुक्राणु येऊ शकतात**(क्रमशः)**

## २ Joke विनोद




मूर्खपणाची उंची किती असू शकते? तुमची उंची किती आहे?

## ३ Message संदेश



RABBA DUKH NA DENA
MERE DOST KO
CHAHE MUJHE SUKHO
KA PAHAD DEDE
NAYI CYCLE PAR
GHUME DOST MERA
MUZE BHALE HI PURANI
BMW CAR DEDE...

## ४ Thought सुविचार




पवित्र असावे पण पतित होऊ नये.
अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**अनागतं यः कुरुतेस शोभते ।**
**स शोचते यो न करोत्यनागतम्।।**

अर्थः जो आगामी संकटाचा विचार करतो तो सुखी असतो आणि जो त्याचा विचार करीत नाही त्याला दुःख सोसावे लागते.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



आडवे शब्द
१. सुंदर पती-पत्नीचा जोडा
५. हार
८. काळे ज्वालाग्रही खनिज
११. मऊ, मृदू
११अ. दारुचा एक प्रकार
१२. यजमान, पती
१४. रक्षण करणारा
१५. बाजार
१६. पावसाची झड
१७. पापणी न हलवता (पाहणे)
१९. सरपणाचे दुकान
२१. संत रामदासस्वामी यांनी रचलेला ग्रंथ
२४. जोम, मस्ती
२५. अवस्था, दशा
२७. पंख
२८. तुरुंग
२९. काठाच्या नक्षीप्रकारामुळे प्रसिद्ध धोतरप्रकार ---- काठी
३१. वर्ष
३२. अडकित्त्याने कातरण्याचे विड्यात घातले जाणारे फळ
३४. हळद पिऊन का अशी होता येणार?
३५. कागदावर आखलेला कप्पा
३७. आचारी
३९. माफी मागणारा
४२. दिवाणखाना
४३. सत्य
४४. अतिरेक, टोक
४५. मोठे गाव
४७. मातापिता
५१. कुटी
५२. कागदाचे एक परिमाण
५३. ढीग, चळत
५४. शाळेतील शिक्षिका
५५. केस काळे करण्याचे साधन
५७. वेल
५९. समुद्र
६१. विनोबाजींच्या गीतेवरील ओव्या
६३. लढतना मृत्यू येणे
६५. अखंड
६६. दृष्ट
६७. स्त्री
६८. रोखलेली नजर
६९. शेळी
७१. मैत्रीण
७२. ठराविक पैसे
७४. पायंडा, पद्धत
७६. दरोडा
७८. धोकादायक
८०. माणूस
८२. सूर्याचे एक नाव
८४. सटकन, पटकन
८५. मातीचा कण
८६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

उभे शब्द
१. रत्नजडित माळ
२. अंत:करण
३. किंमत
४. नमन
५. मागील अंगणाचा दरवाजा
६. मीठ
७. अरण्य
८. नवाकोरा
९. रेचक
१०. एक पालेभाजी
१३. दरारा, इभ्रत, वजन
१८. सुसर
२०. जनगणना
२२. नरमांजर
२३. पृथ्वी
२५. भूतकाळ
२६. चिंतन
२७. परीक्षा घेणारा
३०. आशीर्वाद देणारी
३१. मित्र
३३. प्रयत्न
३६. बेकरीतील एक गोड पदार्थ
३८. पहाटेची गाढ निद्रा
४०. तुळशीमाळ धारण करणारा
४१. पार्थिवावरचे वस्त्र
४५. यमपुरी
४६. घरातील मोठी माणसे
४८. घाबरणे
४९. एक बारीक धान्य
५०. पायाचे उभे हाड
५४. स्त्रीलंपट
५६. चकचकीत, स्वच्छ
५८. चांदणी
५९. भेग, चीर
६०. किल्लेदार
६२. दिवसाचा चोविसावा भाग
६४. धनुष्यबाण
६५. अफूचे बी
६७. पूर्ण नेस्तनाबूत
६९. भाजपची विद्यार्थी संघटना
७०. ज्ञाती
७३. विचारांचे, भावनांचे इंद्रिय
७५. होडी
७७. वसन, वस्त्र
७९. बशीचा जोडीदार
८१. नवरामुलगा
८३. तीक्ष्ण नजरेचा पक्षी

आडवे उत्तर
१.रतिमदन ५.पराभव ८.कोळसा ११.नरम ११अ.रम १२.नवरा १४.रक्षक १५.हाट १६.सर १७.टकमक १९.वखार २१.दासबोध २४.रग २५.गत २७.पर २८.कारा २९.करवत ३१.सन ३२.सुप-ारी ३४.गोरी ३५.रकाना ३७.खानसामा ३९.क्षमायाचक ४२.दालन ४३.खरी ४४.कळस ४५.नगर ४७.जनकजननी ५१.झोपडी ५२.रीम ५३.चवड ५४.बाई ५५.कलप ५७.लता ५९.सागर ६१.गीताई ६३.धारातीर्थी पडणे ६५.सलग ६६.खल ६७.नारी ६८.टक ६९.अजा ७१.सखी ७२.रकम ७४.रीतभात ७६.डाका ७८.खतरनाक ८०.मानव ८२.रवि ८४.टपकन ८५.रज ८६.पदरमोड

उभे उत्तर
१.रत्नहार २.मन ३.दर ४.नमस्कार ५.परसदार ६.रामरस ७.वन ८.कोरा करकरीत ९.सारक १०.चाकवत १३.वट १८.मगर २०.खानेसुमारी २२.बोका २३.धरा २५.गतकाल २६.मनन २७.परीक्षक ३०.वरदायिनी ३१.सखा ३३.प्रयास ३६.नानकटाई ३८.साखरझ-ोप ४०.माळकरी ४१.कफन ४५.नरक ४६.वडीलधारी ४८.कचरणे ४९.जव ५०.नडगी ५४.बाईलवेडा ५६.लखलखीत ५८.तारा ५९.सापट ६०.गडकरी ६२.तास ६४.तीरकमान ६६.खसखस ६७.नायनाट ६९. अभाविप ७०.जात ७३.मन ७५.तर ७७.कापड ७९.कप ८१.वर ८३.घार




# सूरसम्राज्ञीना मुंबई इंडियन्सच्या खेळाडूंकडून श्रद्धांजली




मुंबई : आयपीएलमधील २० व्या साखळी सामन्यात रविवारी मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे दोन दिग्गज संघ आमने-सामने आहेत. मुंबईच्या ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर हा सामना खेळवला जात असून, सामन्याच्या सुरुवातीला एक अत्यंत भावूक क्षण पाहायला मिळाला.

भारतीय संगीत क्षेत्रातील एक महान पर्व आज संपले आहे. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले असून. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने संपूर्ण देशावर शोककळा पसरली असून, क्रीडा विश्वानेही त्यांना मानवंदना दिली आहे. आशा ताईंच्या स्मृतीप्रित्यर्थ आजच्या सामन्यात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मुंबई इंडियन्सचे सर्व खेळाडू आशा भोसले यांना श्रद्धांजली म्हणून हाताला काळी पट्टी बांधून मैदानात उतरले आहेत. तर सामना सुरू होण्यापूर्वी दोन्ही संघांचे खेळाडू, पंच आणि उपस्थित प्रेक्षकांनी एक मिनिटाचे मौन पाळून त्यांना आदरांजली अवाहिली. मौन पाळल्यानंतर संपूर्ण स्टेडियममधील चाहत्यांनी टाळ्या वाजवून या महान गायिकेच्या योगदानाचे स्मरण केले.

या महत्त्वाच्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या याने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्णधार हार्दिक पांड्याने जाहीर केले की, मिचेल सँटनर आणि मयंक मार्कंडे संघात परतले असून, अल्लाह गझनफर आणि दीपक चहर यांना विश्रांती देण्यात आली आहे. दरम्यान, आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारने जाहीर केले की, जोश हेझलवूडच्या

# कोलकाताच्या स्टार गोलंदाजावर २ वर्षांची बंदी

## पाकिस्तानचा मोठा निर्णय, नेमके काय घडले?

मुंबई-पाकिस्तान क्रिकेट बोर्ड कडून बीसीसीआय विरोधात अधूनमधून दिसणारी नाराजी पुन्हा एकदा समोर आली आहे. पीसीबी सतत आपली टी-२० लीग पाकिस्तान सुपर लीग ही आयपीएलपेक्षा मोठी असल्याचा दावा करत असते, पण प्रत्यक्षात मात्र त्यांना वारंवार निराशाच हाताला लागते.

पीएसएल २०२६ हंगामात खेळण्यासाठी करारबद्ध असलेल्या काही परदेशी खेळाडूंनी पाकिस्तानला जाण्यास नकार देत आयपीएलमध्ये खेळण्याचा निर्णय घेतला. त्यात झिम्बाब्वेचा वेगवान गोलंदाज ब्लेसिंग मुझारबानी याचाही समावेश होता. यामुळे चिडलेल्या पीसीबीने त्याच्यावर पीएसएलम धून दोन वर्षांची बंदी घालण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.

### आयपीएलमध्ये केकेआरकडून संधी

ब्लेसिंग मुझाराबानीला आयपीएल आणि पीएसएल दोन्ही लिलावात सुरुवातीला कुठल्याही संघाने विकत घेतले नव्हते. त्यानंतर इस्लामाबाद युनायटेडने त्याला रिप्लेसमेंट खेळाडू म्हणून संघात घेतले. मात्र आयपीएल २०२६ सुरू होण्याच्या आधी कोलकाता नाइट रायडर्सने त्याच्याशी संपर्क साधला, कारण मुस्तफिझुर रहमान बाहेर गेल्याने त्यांना पर्याय हवा होता. ब्लेसिंग मुझाराबानीने पीएसएल सोडून आयपीएलमध्ये खेळण्याचा निर्णय घेतला, आणि याच निर्णयामुळे पीसीबी संतापले. अखेर त्यांनी त्याच्यावर दोन वर्षांची बंदी घातली.

### आधीही घडलेला प्रकार

याआधीही असा प्रकार घडला होता. दक्षिण आफ्रिकेचा खेळाडू कॉर्बिन बॉशने पीएसएल सोडून आयपीएलमध्ये खेळण्याचा निर्णय घेतला होता, तेव्हा पीसीबीने त्याच्यावर एका वर्षाची बंदी घातली होती. ब्लेसिंग मुझाराबानी व्यतिरिक्त स्पेन्सर जॉन्सन आणि दासुन शनाका यांनीही शेवटच्या क्षणी पीएसएलमध्ये खेळण्यास नकार देत आयपीएलमध्ये सहभाग घेतला. त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई जाहीर झालेली नाही, मात्र त्यांनाही बंदीचा सामना करावा लागू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. इस्लामाबाद युनायटेडने मुजरबानीला सुमारे ३६ लाख रुपयांत घेतले होते, तर केकेआरने आयपीएलमध्ये त्याला ७५ लाख रुपयांच्या बेस प्राइसवर आपल्या संघात सामील

## थोडक्यात/ संक्षिप्त

### संजूच्या जिद्दीचा विजय; आयसीसी मप्लेयर ऑफ द मंथफकिताबावर आता सॅम सनचंच नाव, रचला इतिहास

मुंबई-संजू सॅमसनचा धमाका सुरूच आहे. २०२६ च्या टी-२० विश्वचषकात टीम इंडियाला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात त्याच्या उत्कृष्ट कामगिरीची आता आयसीसीने दखल घेतली आहे. आयसीसीने संजू सॅमसनला मार्च महिन्यासाठी मप्लेअर ऑफ द मंथफम्हणून घोषित केले आहे, ज्या महिन्यात त्याने सलग तीन अर्धशतके झळकावली. यासह, संजूने इतिहास रचला आहे आणि एक नवीन अध्याय लिहिला आहे.

आधी प्लेइंग-११मधून बाहेर, मग सलग तीन अर्धशतके-आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संजू सॅमसनला मार्च महिन्यासाठी मप्लेअर ऑफ द मंथफम्हणून घोषित करण्यात आले आहे. जेव्हा टी-२० विश्वचषक सुरू झाला, तेव्हा तो भारतीय संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये नव्हता. पण, जसजशी स्पर्धा पुढे सरकली, तसतशी त्या जागेची त्याची गरज भासू लागली. त्याने डावाची सुरुवात केली, परंतु पहिल्या काही डावांमध्ये तो छाप पाडण्यात अपयशी ठरला.

### सूर्यकुमारची कर्णधारपद राहणार की जाणार?

नवी दिल्ली,-भारताने मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याच्या मार्गदर्शनात आणि कर्णधार सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्त्वात २०२६ च्या टी २० वर्ल्ड कपमध्ये विजेतेपद मिळवलं. गौतम गंभीरपुढं आता पुढील मोठं आव्हान म्हणजे २०२७ चा एकदिवसीय सामन्यांचा वर्ल्ड कप हे आहे. बीसीसीआयच्या करारानुसार गौतम गंभीर तोपर्यंत भारताचा मुख्य प्रशिक्षक असेल. मात्र, काही रिपोर्टनुसार गौतम गंभीरला २०२८ च्या टी २० वर्ल्ड कप पर्यंत मुदतवाढ मिळण्याची आशा आहे. तर, भारताच्या टी २० संघाचा कर्णधार म्हणून सूर्यकुमार यादव गौतम गंभीरची पहिली पसंत आहे. भारतानं २०२४ चा टी २० वर्ल्ड कप जिंकल्यानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी ते पद सोडलं. यानंतर गौतम गंभीरकडे भारताचं मुख्य प्रशिक्षक पद देण्यात आलं आहे. गौतम गंभीरपुढं आता दोन आव्हानं आहेत ती म्हणजे भारताला वनडे वर्ल्ड कप जिंकवून देणं आणि जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचवणं आणि भारताला विजेतेपद मिळवून देणं. मात्र, काही रिपोर्टनुसार गौतम गंभीर याला २०२८ च्या टी २० वर्ल्ड कपपर्यंत मुदतवाढ मिळेल अशी आशा आहे. आता बीसीसीआय काय निर्णय घेते याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.


### प्लेऑफ जवळ येताच ईशान किशनची मोठी खेळी, रोहितची विकेट घेणाऱ्या खेळाडूला दिली संघात एंन्ट्री

**मुंबई**-आयपीएलचा आता तिसरा आठवडा सूरू झाला आहे आणि सगळेच संघ आता प्लेऑफसाठी क्वालिफाय होण्यासाठी मैदानात जोर लावतायत. अशावेळी सनरायझर्स हैदराबादचा कॅप्टन ईशान किशनने मोठी खेळी केली आहे. ईशान किशनने मुंबई इंडियन्सचा दिग्गज फलंदाज रोहित शर्माची विकेट घेणाऱ्या खेळाडूला ताफ्यात घेतलं आहे.त्यामुळे सनरायझर्स हैदराबादची ताकद वाढणार आहे. खरं तर सनरायझर्स हैदराबादचा संघ मैदानात प्रॅक्टीस करत असताना ब्रायडन कार्सला दुखापत झाली होती. त्यामुळे आता कार्स स्पर्धेबाहेर झाला आहे. आता त्याच्या जागी श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज दिलशान मदुशंकाला संघात संधी देण्यात आली आहे. मदुशंकाला ७५ लाख रुपयाच्या मुळ किमतीत सनरायझर्स हैदराबाद संघात सामील होईल. मफसनरायझर्स हैदराबादने (एसआरएच) टाटा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ च्या उर्वरित सामन्यांसाठी ब्रायडन कार्सच्या जागी दिलशान मदुशंकाची निवड केली आहे. दुखापतीमुळे कार्स चालू आयपीएल हंगामातून बाहेर झाला

# आसाम क्रिकेट संघटनेकडून मैदान कर्मचार्यांना २५ लाखांचे बक्षीस

## अध्यक्ष तरंगा गोगोई यांनीही त्यांच्या परिश्रमाचे कौतुक केले

**गुवाहाटी :** आसाम क्रिकेट असोसिएशन (एसीए) ने बरसापारा क्रिकेट स्टेडियममधील मैदान कर्मचार्यांसाठी २५ लाख रुपयांच्या रोख बक्षिसाची घोषणा केली आहे. आव्हानात्मक हवामान असूनही आयपीएल सामने यशस्वीपणे पार पाडण्यात या कर्मचार्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली.मुसळधार पाऊस आणि वादळी वातावरणामुळे सामन्यांवर परिणाम झाला होता. ७ एप्रिल रोजी झालेला राजस्तान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामना ११ षटकांपर्यंत मर्यादित करण्यात आला, तर १० एप्रिल रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळूर आणि राजस्तान रॉयल्स यांच्यातील सामना पावसामुळे थांबवावा लागला.एसीएचे सचिव सनातन दास यांनी मैदान कर्मचार्यांच्या परिश्रमाचे कौतुक करत त्यांच्या योगदानामुळे सामने सुरळीत पार पडल्याचे सांगितले. अध्यक्ष तरंगा गोगोई यांनीही त्यांच्या




# २०३० राष्ट्रकुल स्पर्धेत क्रिकेट-हॉकीचा समावेश; पारंपरिक खेळांनाही संधी : मनसुख मांडविया



**नवी दिल्ली :** २०३० मध्ये भारतात होणार्या राष्ट्रकुल स्पर्धेतक्रिकेट आणि हॉकीचा समावेश निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी दिली. यासोबतच कबड्डी, योग, खो-खो आणि मल्लखांब या पारंपरिक भारतीय खेळांचाही समावेश करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.राष्ट्रकुल क्रीडा महासंघाच्या शिष्टमंडळाने अहमदाबादमध्ये तयारीचा आढावा घेतला असून भारतातील क्रीडा पायाभूत सुविधांबाबत समाधान व्यक्त केले आहे. मांडविया यांनी सांगितले की, ग्लासगो येथे होणार्या स्पर्धेत क्रिकेट आणि हॉकी वगळण्यात आले असले तरी २०३० मध्ये हे दोन्ही खेळ पुन्हा समाविष्ट केले जातील.भारतामध्ये २०१० नंतर प्रथमच राष्ट्रकुल स्पर्धा होत असून विविध क्रीडा प्रकारांचा समावेश केला जाणार आहे. यामुळे भारतीय खेळांना आंतरराष्ट्रीय

# गुजरात आणि चेन्नईच्या दोन सामन्यांचे ठिकाण बदलले


**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेत गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यातील दोन महत्त्वाच्या सामन्यांच्या ठिकाणात बदल करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने अधिकृतरित्या हा निर्णय जाहीर केला आहे.पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार २६ एप्रिल रोजी होणारा सामना अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम येथे खेळवला जाणार होता. मात्र, आता हा सामना चेन्नईतील एम. ए. चिदंबरम स्टेडियम येथे होणार आहे. या सामन्याची वेळ दुपारी ३:३० अशीच कायम ठेवण्यात आली आहे.



त्याचप्रमाणे, २१ मे रोजी चेन्नईत होणारा सामना आता अहमदाबाद येथे हलवण्यात आला असून तो संध्याकाळी ७:३० वाजता खेळवला जाईल.या बदलामागे प्रमुख कारण म्हणजे गुजरात राज्यातील महानगरपालिका निवडणुका होय. निवडणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त आवश्यक असतो. त्याचवेळी हजारो प्रेक्षक उपस्थित राहणार्या सामन्यांचे आयोजन करणे प्रशासनासाठी आव्हानात्मक ठरू शकते.या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने राज्य सरकार आणि स्थानिक प्रशासनाशी चर्चा करून हा निर्णय घेतला आहे. सामन्यांच्या तारखा आणि वेळा

# महेंद्रसिंग धोनीची पत्नी साक्षी धोनी मुलीसह साईचरणी लीन, लाखोंची देणगीही दिली; धोनीबाबत म्हणाली...

शिर्डी-चेन्नई सुपर किंग्स संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीची पत्नी साक्षी धोनी आणि मुलगी झिवा यांनी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं मनोभावं दर्शन घेतलं आहे. यावेळी साक्षी धोनी आणि झिवा यांनी साईबाबांच्या माध्यान्ह आरतीला हजेरी लावली आहे. साईबाबांच्या दर्शनानंतर साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि उपकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी साक्षी धोनी यांचा साईबाबांची मूर्ती आणि शाल देऊन सत्कार केला आहे. यावेळी शिर्डीतील नगरसेवक दीपक गोंदकरही उपस्थित होते. दर्शनानंतर काय म्हणाली साक्षी : साईबाबांच्या समाधीच्या दर्शनानंतर साक्षी धोनीनं साईंच्या द्वारकामाई, गुरुस्थान मंदिरात जाऊन दर्शन घेतलं. तसंच यानंतर मंदिर परिसरातील देणगी कार्यालयात जात साक्षी धोनीनं साईबाबा संस्थानच्या मेडिकल फंडासाठी ७ लाख रुपयांची देणगी दिली आहे. तीन वर्षांची असल्यापासून आई-वडिलांसोबत शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेत आहे. आज माझी मुलगी झिवा हिला पहिल्यांदाच साईबाबांच्या दर्शनासाठी घेऊन आली असल्याचं साक्षीनं सांगितलं आहे. साईबाबांचं दर्शन घेऊन मनाला शांती आणि समाधान मिळते. याशिवाय साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेऊन एक वेगळीच ऊर्जा मिळते असंही साक्षीनं सांगितलं. धोनीबाबात काय म्हणाली साक्षी : यावेळी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि नगरसेवक दीपक गोंदकर यांनी आपण महेंद्रसिंग धोनी यांना शिर्डीला दर्शनासाठी कधी घेऊन येणार? असं विचारले असता. साक्षी यांनी सांगितलं, साईबाबांचं बोलावणं आल्याशिवाय कोणीही त्यांच्या दर्शनासाठी येऊ शकत नाही. महेंद्रसिंग धोनीला जेव्हा साईबाबांचं बोलावणं येईल तेव्हा नक्कीच धोनीला दर्शनासाठी घेऊन येऊ असंही साक्षीनं सांगितलं. धोनी आजच्या सामन्यात खेळणार? : ४४ वर्षीय महेंद्रसिंग धोनी आयपीएल २०२६ हंगामाच्या सुरुवातीपासून दुखापतीनं त्रस्त आहे. त्याच्या अनुपस्थितीमुळं सीएसके संघात नेतृत्व आणि फिनिशिंगची तीव्र कमतरता जाणवत आहे. पाच वेळचा चॅम्पियन असलेला हा संघ चार सामन्यात एका विजयासह सध्या गुणतालिकेत तळाशी असून यष्टीरक्षणासाठी पूर्णपणे संजू सॅमसनवर अवलंबून आहे, ज्यामुळं संघाच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.



# वैभव सूर्यवंशी आऊट झाला खरा, पण टीम इंडियातील जागा पक्की




मुंबई -वैभव सूर्यवंशी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापासून आता फार दूर नाहीत. त्याचा डेब्यू येत्या जून महिन्यात होण्याची दाट शक्यता आहे. गेल्या वर्षी आयपीएलमध्ये पदार्पण केल्यानंतर त्याने अंडर-१९ आणि देशांतर्गत क्रिकेटमध्येही दमदार कामगिरी करत आपली छाप पाडली आहे. आयपीएल २०२६ मध्येही तो तुफानी कामगिरी करत आहे. सनरायझर्स हैदराबादविरुद्धचा अपवाद वगळता त्याने प्रत्येक सामन्यात संघाला चांगली सुरुवात करून दिली आहे. जर जूनमध्ये वैभवने टीम इंडियासाठी पदार्पण केले, तर तो एक ऐतिहासिक क्षण ठरेल आणि सचिन तेंडुलकरचा अनेक वर्षांपूर्वीचा विक्रमही तोडला जाऊ शकतो.

भारतीय क्रिकेट संघ यंदा जूनमध्ये आयर्लंड दौऱ्यावर जाणार असून, या दौऱ्यात दोन टी-२० सामने खेळवले जाणार आहेत. पहिला सामना २६ जूनला तर दुसरा २८ जूनला होईल. या दौऱ्यासाठी निवड समिती वैभव सूर्यवंशीचा संघात समावेश करू शकते. आता वैभव १५ वर्षांचा झाला असून, राष्ट्रीय संघासाठी पात्र ठरण्याची ही किमान वयोमर्यादा आहे. माध्यमांच्या अहवालानुसार निवडकर्त्यांनी त्याला शॉर्टलिस्ट केले आहे. जर त्याची निवड झाली आणि त्याने पदार्पण केले, तर तो भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी वयात खेळणारा खेळाडू ठरेल.

### निवडकर्त्यांच्या रडारवर वैभव

बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वैभव सूर्यवंशी आयर्लंड दौऱ्यासाठी प्रमुख दावेदारांपैकी एक आहे. इतर खेळाडूंप्रमाणेच त्याचे नावही शॉर्टलिस्ट करण्यात आले आहे. त्याची आक्रमक फलंदाजी आणि पहिल्याच चेंडूपासून मोठे फटके मारण्याची क्षमता पाहता, तो टी-२० फॉरमॅटसाठी अत्यंत योग्य मानला जातो.

### आयपीएल २०२६ मध्येही धडाकेबाज प्रदर्शन

अवघ्या १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने गेल्या वर्षी आयपीएलमध्ये ३५ चेंडूंमध्ये शतक झळकावले होते, जे स्पर्धेतील दुसरे सर्वात जलद आणि भारतीय खेळाडूकडून झालेले सर्वात जलद शतक आहे. आयपीएल २०२६ मध्येही त्याची चमक कायम आहे. पहिल्या दोन सामन्यांत त्याने ३१ आणि ३९ धावा करत झपाट्याने सुरुवात करून दिली. त्यानंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूविरुद्ध त्याने ७८ धावांची धडाकेबाज खेळी साकारली. जसप्रीत बुमराहच्या पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकत त्याने आंतरराष्ट्रीय स्तरासाठी आपण तयार असल्याचा ठसा उमटवला. मात्र, सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात तो पहिल्याच चेंडूवर बाद झाला.

## सरस्वती महाविद्यालयात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ.पांडुरंग गोरे,प्रा.डॉ.संतोष कुलकर्णी,प्रा. डॉ. वसंत बंडे,प्रा.डॉ. सुदाम पवार,प्रा.डॉ. बालाजी शिंदे,प्रा.अमोल जाधव,प्रा.डॉ.राम खलंग्रे ,प्रा.ज्योती मामडगे,प्रा.डॉ. मोनालिसा खानोरकर,प्रा. तुकाराम येमले,प्रा.श्रीमंत दोरवे,श्री. शशिकांत सोळुंके, श्री. विठ्ठल चव्हाण,श्री. बळीराम कदम, सौ.भागिरथी लाड उपस्थित होते.

याप्रसंगी महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ.वसंत बंडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे यांचे सामाजिक समतेचे विचार या विषयावर आपले विचार व्यक्त केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र मानव जातीला दिलेले स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हेच मानव जातीच्या कल्याणाचे सार असल्यामुळे त्यांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीने आत्मसात करावेत आणि आपली उन्नती साधावी असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## ‘आठवणींच्या साक्षीने उजळला निरोप समारंभ’; दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एम.कॉम द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एम.कॉम द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण, भावनिक आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला. शिक्षणाचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण करून पुढील आयुष्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम आठवणींचा अमूल्य ठेवा ठरला. सदरील कार्यक्रम १३ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालय सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण तसेच वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयातील दोन वर्षांच्या आठवणींना उजाळा दिला. प्राध्यापकांचे मार्गदर्शन, मित्रमैत्रिणींसोबतचे क्षण, तसेच महाविद्यालयीन जीवनातील विविध अनुभव यांचा त्यांनी मनापासून उल्लेख केला. काही विद्यार्थ्यांनी भावनिक शब्दांत कृतज्ञता व्यक्त करताना डोळ्यांत पाणी आणले, तर काहींनी आनंददायी आठवणी सांगत वातावरण हलकेफुलके केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात प्रामाणिकपणा, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. ‘‘महाविद्यालयाने दिलेली शिस्त, ज्ञान आणि मूल्ये आयुष्यभर उपयोगी पडतील,’’ असे ते म्हणाले. इतर मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अक्षय पवार यांनी प्रभावीपणे केले, तर शेवटी डॉ. मनीषा अष्टेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मराठवाडा चालक संघटनेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती निमित्त अभिवादन




**धाराशिव/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मराठवाडा चालक संघटनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मंगळवारी (१४ एप्रिल) अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील, नगराध्यक्ष नेहा काकडे, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, आरपीआय नेते राजाभाऊ ओव्हाळ, नगरसेवक अमित शिंदे, संघटनेचे अध्यक्ष अक्षय ढोबळे, नगरसेवक राहुल काकडे, अभिजीत काकडे, नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, सुशांत सोनवणे, प्रवीण शिरसाटे, नगरसेवक अक्षय जोगदंड,हर्षद देशमुख,पृथ्वीराज सरवदे, ॲड. राजहंस शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे, नगरसेवक खलिफा कुरेशी, नगरसेवक आयाज बबलू शेख, पंकज भोसले, शुभम सुकाळे,संदीप बनसोडे, राजाभाऊ बनसोडे, शामराव बनसोडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती समितीचे अध्यक्ष सतीश बाबुराव ओव्हाळ, उपाध्यक्ष दत्तात्रय विठ्ठल वाघमारे, सचिव आकाश भारत खंडागळे, मार्गदर्शक उत्तम घरबुडवे, सुधाकर लष्करे, संयोजक सुशांत वसंतराव बनसोडे, किशोर गायकवाड, अनुप सोनवणे, किशोर सरवदे, लक्ष्मण वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अखिल भारतीय समाजाचे भाग्यविधाते

### सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांचे प्रतिपादन

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून आपल्याला पवित्र ग्रंथ दिला. त्यांनी संपूर्ण देशातील समाजाचा विचार केला आणि त्यामुळेच ते अखिल भारतीय समाजाचे भाग्यविधाते होते असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी बोलताना व्यक्त केले.



महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील आय.क्यू.ए.सी, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग, समाजकार्य विभाग, ग्रंथालय आणि लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सव अंतर्गत १८ तास अभ्यास अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे हे होते तर विचारमंचावर संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा.कल्याण कांबळे, डॉ.सिद्धार्थ सूर्यवंशी, मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी आणि डॉ. रत्नाकर बेडगे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, बाराव्या शतकामध्ये जगतज्योती महात्मा बसवेश्वरांनी समता आणि मानवी कल्याणाचा विचार प्रत्यक्ष कृतीमध्ये आणला. त्याचप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये समाजात रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. महाविद्यालयातील शिक्षक हे विद्यार्थ्यांचे आई-वडील असतात त्यामुळे त्यांच्या अपेक्षा आपण पूर्ण केल्या पाहिजे. आज आपल्या देशामध्ये मानवता धर्म निर्माण करणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती विकसित होण्यासाठी अशा अभियानाची नितांत आवश्यकता आहे असे सांगून सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रा.कल्याण कांबळे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना वाचनाची प्रचंड इच्छा शक्ती होती त्यांनी ग्रंथासाठी स्वतंत्र राजगृहाची निर्मिती केली. हा आदर्श आपण घेतला पाहिजे. यावेळी बोलताना माजी प्राचार्य डॉ.सिद्धार्थ सूर्यवंशी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण जीवनपटावर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनामध्ये अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे. महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड अशा उपक्रमातून निर्माण होते असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले, डॉ. संजय गवई यांनी सर्वांना त्रिसरण पंचशील दिले. प्रास्ताविकपर मनोगत लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ.गीता गिरवलकर यांनी व्यक्त केले तर आभार डॉ.श्रीराम भालेराव यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता आय.क्यू.ए.सी समन्वयक प्रो.डॉ. आनंद शेवाळे, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश मौने, प्रा.काशिनाथ पवार, प्रो.डॉ.शिवप्रसाद डोंगरे, असोसिएट एनसीसी ऑफिसर डॉ. सुजित हांडीबाग, प्रा.आशीष क्षिरसागर, ग्रंथपाल डॉ.प्रमोद सराफे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, समाजकार्य विभागातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक/स्वयंसेविका, राष्ट्रीय छात्र सेनेचे सर्व कॅडेट्स आणि क्रीडा विभागातील सर्व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख चषक - २०२६ टर्फ क्रिकेट स्पर्धेचे रेणा साखर कारखान्याकडून आयोजन

### मांजरा परिवारातील अधिकारी,कर्मचा-यांसाठी क्रिकेटचा जल्लोष

**लातूर/प्रतिनिधी :** रेणा सहकारी साखर कारखाना लि., दिलीपनगर, निवाडा, रेणापूर, जि. लातूर यांच्या वतीने सहकार महर्षी माजी मंत्री आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेबांच्या जन्मदिनानिमित्त ‘‘सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख चषक - टर्फ क्रिकेट स्पर्धा : २०२६’’ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८.३० ते सायंकाळी ८.०० या वेळेत उत्साहात पार पडणार आहे.



या स्पर्धेमध्ये मांजरा परिवारातील सर्व साखर कारखान्यांमधील अधिकारीवर्गाच्या प्रत्येकी एका संघाचा सहभाग असणार असून, स्पर्धा टर्फ मैदानावर रंगणार आहे. या माध्यमातून अधिकारी,कर्मचारी वर्गामध्ये क्रीडाभावना, एकोपा आणि संघभावना वृद्धिंगत करण्याचा उद्देश आयोजकांनी व्यक्त केला आहे.

स्पर्धेसाठी आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. सांघिक गटामध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघाला ₹१५,००१ रोख रक्कम व चषक, द्वितीय क्रमांकासाठी ₹११,००१ व स्मृतीचिन्ह, तर तृतीय क्रमांकासाठी ₹७,००१ व स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे. तसेच वैयक्तिक गटात ‘‘बेस्ट बॅट्समन ऑफ द टूर्नामेंट’’ आणि ‘‘बेस्ट बॉलर ऑफ द टूर्नामेंट’’ या दोन्ही पुरस्कारांसाठी प्रत्येकी ₹२,००१ रोख रक्कम व स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे.

या स्पर्धेमुळे क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, मांजरा परिवारातील सर्व संबंधितांनी, पिच अँड प्लेट टर्फ, वाटीका हॉटेल जवळ, औसा रोड येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन रेणा साखर कारखाना चेअरमन श्री अनंतराव ठाकूर (देशमुख), व्हाईस चेअरमन ॲड.श्री.प्रविण पाटील,कार्यकारी संचालक बी व्ही मोरे व सर्व संचालकां कडून करण्यात आले आहे.

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात महामानवास अभिवादन




**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अशविनी केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, पर्यवेक्षक गुरमे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याला उजाळा दिला.

## लातूर येथे ज्येष्ठ नागरिक जनजागृती कार्यशाळा आणि लाभार्थी मेळावा उत्साहात




**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक समता सप्ताहाचे औचित्य साधून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने लातूर येथील वेद प्रतिष्ठान येथे ज्येष्ठ नागरिक जनजागृती कार्यशाळा, तसेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर उपस्थित होते. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांचे हक्क आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या विविध कायदेविषयक बाबींवर सखोल मार्गदर्शन केले. कायद्याची माहिती असल्यास ज्येष्ठ नागरिक आपले जीवन अधिक सुरक्षित आणि स्वाभिमानाने जगू शकतात, असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी मंचावर सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यादव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोष नाईकवाडी, आणि ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव प्रकाशजी घादगीने यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव प्रकाशजी घादगीने लिखित पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकात महात्मा ज्योतिबा फुले, लोकराजा राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

या मेळाव्याला लातूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक, समाज कल्याण पुरस्कार प्राप्त मान्यवर, समाज कल्याण कार्यालयातील कर्मचारी आणि विविध योजनांचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात १४ एप्रिलपर्यंत सामाजिक समता सप्ताह; विद्यार्थ्यांसाठी जात वैधता प्रमाणपत्र विशेष मोहीम

**लातूर/प्रतिनिधी :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर कार्यालयामार्फत १ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील इयत्ता अकरावी व बारावी विज्ञान शाखेतील तसेच सन २०२६-२७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जात पडताळणी प्रकरणे संकलित केली जाणार आहेत. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी तालुका व महाविद्यालयनिहाय संख्यात्मक माहिती समान संधी केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालय तसेच जिल्हा स्तरावर गोळा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सामाजिक समता सप्ताहादरम्यान सीईटी देणारे विद्यार्थी आणि डिप्लोमा तृतीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरून घेण्यावर भर दिला जाणार आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी संबंधित महाविद्यालयातील समान संधी केंद्रामार्फत विशेष वेबिनारचे आयोजनही करण्यात येणार आहे.

समान संधी केंद्रांच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांवर जात पडताळणी समितीच्या वतीने तात्काळ कार्यवाही करून विद्यार्थ्यांना वैधता प्रमाणपत्रे दिली जातील. जिल्ह्यातील विज्ञान शाखेतील व सीईटी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करून या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य बलभीम शिंदे यांनी केले आहे.

## कलापंढरी सामाजिक संस्थेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




**लातूर/प्रतिनिधी :** कलापंढरी सामाजिक संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आज संस्थेच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शिल्पा देहाड कार्यक्रम व्यवस्थापक क्राय संस्था मुंबई यांच्याहस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

सदर कार्यक्रमास बी. पी. सूर्यवंशी, शिवदर्शन सदाकाळे, जयवंत जंगापल्ले, धनराज पवार, नादिर शेख, सुर्यकांत हाके, नितीन समुखराव, कांचन भोसले, जयश्री क्षीरसागर, प्रीती काळे, पूनम सूर्यवंशी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# प्रियदर्शनी मराठी प्राथमिक शाळा, धाराशिव येथील शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



धाराशिव (प्रतिनिधी)-दि. १४ एप्रिल २०२६ रोजी प्रियदर्शन मराठी प्राथमिक शाळा, खाँजा नगर, धाराशिव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठया उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती इनामदार बी.एफ. यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी प्रतिमा पुजन करुन वंदन केले.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती इनामदार बी.एफ. यांनी प्रास्ताविकपर भाषणातून संविधान व कायद्याची माहिती शाळेतील उपस्थित विद्यार्थ्यांना सांगितली. तद्नंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आपल्या भाषणातून सांगितले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय परवानगीने खाऊ वाटपानंतर हा कार्यक्रम संपल्याचे जाहिर केले.

यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. शिंदे एस.आर. व आभार श्री हाळीकर झेड सी. यांनी मानले.

# के. टी. पाटील महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी के.टी.पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.सदर कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल जोशी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून केली.

यावेळी त्यांनी असे सांगितले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ,अर्थशास्त्रज्ञ,राजकारणी,तत्वज्ञ आणि समाजसुधारक होते.त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि दलित लोकांविरुद्ध होणार सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली.तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले.

ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री,स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री,भारतीय संविधानाचे शिल्पकार,भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते.देशाच्या विविध क्षेत्रात दिलेल्या योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार किंवा आधुनिक भारताचे निर्माते असेही म्हणतात.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो चे कार्यक्रम अधिकारी प्रा.अतुलकुमार अलकुंटे ,उपकार्यक्रम अधिकारी प्रा.शिवरत्न खरे, प्रा. पल्लवी हंगरगेकर स्वयंसेवक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जळकोट येथे गणेश दादा सोनटक्के मित्र परिवाराच्यावतीने गुणवंतांचा सत्कार



जळकोट(विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे भाजपाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश दादा सोनटक्के मित्र परिवाराच्या वतीने वेगवेगळ्या घटकांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा येथोचित सत्कार करण्यात आला. जळकोट येथील सदनशील शेतकरी दयानंद साखरे यांची मुलगी साक्षी दयानंद साखरे यांची महाराष्ट्र पोलीस दलात मुंबई येथे नियुक्ती झाल्याबद्दल व देवांग माणिक सोनटक्के, आदित्य रमेश क्षीरसागर या विद्यार्थ्यांची नवोदय साठी पात्र झाल्याबद्दल व तसेच क्रांती लक्ष्मीकांत पाटील हिने एम. टी. एस मध्ये केंद्रात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल गणेश दादा सोनटक्के मित्र परिवाराच्या वतीने फेटा, शाल ,पुष्पहार देऊन येतोचित सत्कार करण्यात आला. व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्या सविताताई सोनटक्के ,माजी सरपंच तमन्नपा माळगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ड.आशिष दादा सोनटक्के, चंद्रकांत स्वामी सर, बबन मोरे, माजी सरपंच संजय अंगुले, बाळासाहेब पाटील,दयानंद साखरे , सतीश माळी, तंटामुक्ती अध्यक्ष यशवंत कदम, संतोष वाघमारे, विश्वनाथ सुरवसे, नागनाथ किलजे, लक्ष्मीकांत पाटील, नामदेव कागे, शेषपा गाढवे, माणिक सोनटक्के आदी मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## 'तडजोड शुल्क' वसुल

धाराशिव(प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१३ एप्रिल रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १८७ कारवाया करुन १,५०,७०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

# सामाजिक समता सप्ताह समारोप उत्साहात:गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान,लाभार्थ्यांना योजनांचा लाभ

धाराशिव (जिमाका) सामाजिक न्याय,आर्थिक व सामाजिक संरक्षण उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे. त्यानुसार अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.या योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावी तसेच जनजागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी ८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

याच अनुषंगाने सामाजिक समता सप्ताहानिमित्त आज १४ एप्रिल २०२६ रोजी सामाजिक न्याय भवन,धाराशिव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून सामाजिक समता सप्ताह समारोप कार्यक्रमआयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार होते.प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवदा महाडदळकर,जिल्हा पोलीस अधीक्षक रितु खोखर व जिल्हा परिषदेचे समाज कल्याण समिती सभापती विश्वास कोकणे उपस्थित होते.सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले.प्रास्ताविक समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले.

या कार्यक्रमात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ अंतर्गत दाखल प्रकरणातील पीडित वारस रोहन बागुल यास शासकीय नोकरीचे नियुक्ती आदेश देण्यात आले.तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत संदीप पाटील यांची सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण पदासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.



शासकीय वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन करून शासनाच्या विविध विभागातील पदांवर निवड झाल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,तेर येथील विद्यार्थिनी अनुश्री मदने हिने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर भाषण केले.तसेच रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पाण्याचे जार भेटवस्तू म्हणून प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे व्याख्याते प्रा.रवी सुरवसे, छत्रपती शिवाजी कॉलेज,धाराशिव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक व कृषीविषयक विचारांवर मार्गदर्शन केले. यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना,परदेश शिक्षण योजनाच्या लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप करण्यात आले.तसेच जात वैधता प्रमाणपत्रांचेही वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी समाज कल्याण अधिकारी सनम लोमकणे यांनी आभार मानले.सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमाचा समारोप उत्साहात संपन्न झाला असून या कार्यक्रमास कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बुद्धिस्ट न्यायालयीन कर्मचाऱ्यांकडून शालेय साहित्य वाटप



धाराशिव (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त धाराशिव येथील बुद्धिस्ट न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वतीने जिल्हा न्यायालय,धाराशिव येथे अभिवादनासह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक प्रसाद शिंदे, सविनय माळाळे, परमेश्वर नागटिळक, दिगंबर वाघमारे, फिरोज मुजावर तसेच अन्य न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

यानंतर यावर्षी सेवानिवृत्त होणाऱ्या अधीक्षक श्रीमती अनिता विजयकुमार तुर्कमाने यांच्या हस्ते फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महिला कर्मचारी अश्विनी बनसोडे, कांबळे मॅडम, स्मिता शिंदे, लांडगे मॅडम, दुर्गा शिरसाठ उपस्थित होत्या.

या उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये स्कूल बॅग, रजिस्टर व वह्या, कंपास पेटी, दहा पेन, परीक्षेचा पॅड आणि पाण्याची बाटली यांचा समावेश होता. अशा प्रकारे ५० विद्यार्थ्यांना साहित्य देण्यात आले. तसेच सुमारे १५०० आईस्क्रीम कपांचेही वितरण करण्यात आले.

यानंतर न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले आणि उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उज्वल चंदने, दिगंबर वाघमारे, फिरोज मुजावर, डांगे मामा, अविनाश दहिभाते, प्रसाद शिंदे,सौरभ विधाते, समाधान गवळी, रक्षित शिंगाडे, प्रकाश कांबळे तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ह.भ.प. कल्याणराव चव्हाण यांचे निधन

धाराशिव (प्रतिनिधी)- संत गोरोबाकाका पब्लिक मंदिर ट्रस्ट पंढरपूरचे उपाध्यक्ष,साने गुरुजी वाचनालय रुईभर चे अध्यक्ष, अध्यात्मिक क्षेत्रातील गाढे अभ्यासक, रुईभर तालुका धाराशिव येथील रहिवासी ,ह.भ.प. कल्याणराव गणपती चव्हाण यांचे दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सोमवारी पहाटे ५:०० वाजता वृद्धापकाळाने व दीर्घ आजाराने निधन झाले. ते ९१ वर्षाचे होते.

लहानपणापासून संत गोरोबा काकांच्या पालखीसोबत तेर ते पंढरपूर नियमितपणे ते पायी वारी करत होते.

त्यांच्या पश्चात भाऊ,बहीन,दोन मुले, तीन मुली,नातू पणतू आहेत. केशव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खानापूर तालुका धाराशिव चे मुख्याध्यापक एकनाथ चव्हाण व सामाजिक वनीकरण विभाग धाराशिव येथील सेवानिवृत्त कर्मचारी गुरुनाथ चव्हाण यांचे ते वडील तर कॉम्रेड नाना चव्हाण यांचे ते भाऊ होत.



अंत्यविधी दुपारी ४ वाजता चव्हाण मळा रुईभर येथे करण्यात आली.यावेळी अध्यात्मिक, शिक्षण, राजकीय, सामाजिक, क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली

# सोन्याचे व चांदीचे दागिने सह रोख रक्कमेची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-विनोद चंद्रकांत पिंगळे, वय ३४ वर्षे, रा. आरणगाव ता. परंडा जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.०८.०४.२०२६ रोजी दि. १३.०४.२०२६ रोज तोडून आत प्रवेश करुन घरातील ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कम २५,००० असा एकुण ७३,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विनोद पिंगळे यांनी दि.१३.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649